# ग्रीनलॉन्स विदयालय

दिनांक - २८-०९-२०२६ TERMINAL EXAMINATION (२०२६) वेळ – २ तास

इयत्ता - ६वी - अ,ब,क **मराठी** मार्क - ८०

**INSTRUCTIONS:-** 1.This paper comprises of two sections.Section A and B.

2. Section A answers must be written on the answer sheet.

3. Section B answers must be written on the paper itself.

And Attach paper with section A answer sheet.

## विभाग - "अ" [४० मार्क]

**प्रश्न १. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. [५]**

१. अवघे ---------------------------- वर्षांचे असताना डॉ. गोवारीकरांनी पत्र लिहिले.

( चौदा, तेरा, सोळा )

२. ''आई, ---------------------------- केवढा असतो?''

( समुद्र, नदी, जलप्रवास )

३. भारताच्या ---------------------------- क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी फार मोठी आहे.

(गणित, विज्ञान, संशोधन )

४. इतक्यात तिची एका ---------------------------- माशाशी टक्कर झाली.

( अष्टभुज, लहान, विचित्र )

५. ---------------------------- ऊर्जा संशोधन केंद्रात संशोधक म्हणून काम केले.

( कोल्हापूरच्या, इंग्लंडच्या, अमेरिकेच्या )

**प्रश्न २.अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ५) (ANY 5) [५]**

१. डॉ. वसंत गोवारीकरांचे पदवीपर्यंतचे शिक्षण कोठे पूर्ण केले?

२. चंद्रावरच्या शाळेत जाताना कशाचे ओझे नसेल?

३. 'चंद्रावरची शाळा' या कवितेची कवयित्री कोण आहे?

४. मिनू मासोळी कुठे राहायची?

५. कोणाच्या आग्रहामुळे ते भारताच्या अवकाश संशोधन केंद्रात रुजू झाले?

६. चंद्रावरती शाळा कोणत्या शतकात भरेल?

७. खडकावर फुललेल्या फुलांचे रंग कोणते होते?

**प्रश्न २.ब) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३) [६]**

१. चंद्रावरच्या शाळेत पास केव्हा केले जाते?

२. घोडमासा पाहून मिनूला हसू का आले?

३. मिनूची व आईची चुकामुक का झाली?

४. चंद्रावरच्या शाळेत चांदण्याशीच का खेळावे लागणार आहे?

**प्रश्न २.क) खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.** **[३]**

| |
|---|
| खड्डू, चंद्रावरचा, शतकातून, एकोणीसाव्या, पळा, चंद्रावरच्या, एकविसाव्या, चंद्रावर्ति, फळा, चंद्रावरती शतकात, खडु |

------------------ ------------------ भरेल

------------------ शाळा,

------------------ शाळेत नसेल

------------------ आणि ------------------.

**प्रश्न ३. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.**

इतक्यात तिची एका विचित्र माशाशी टक्कर झाली. त्याचे तोंड घोडयासारखे होते व पोटाला पिशवी होती. त्यात छोटी छोटी पिल्ले बसलेली होती. मिनूला क्षणभर हसूच आले.

"कोण तुम्ही?" तिने विचारले; पण तो पिवळा मासा काहीच न बोलता हळूहळू पुढे गेला. एवढ्यात तळाकडून आवाज आला. "त्याचं नाव घोडमासा, समुद्रघोडा !" आवाजाच्या रोखाने मिनूने पाहिले. तळाशी एक मोठे कासव बसले होते. नदीत असते त्यापेक्षा कितीतरी मोठे ! मिनू लाटांच्या पायऱ्या उतरत त्याच्याजवळ पोहोचली व म्हणाली, "कासवदादा, तुम्ही इकडं कधी आलात?"

"मी तर इथंच राहतो" ते म्हणाले. "नाहीच मुळी. आमच्या नदीतही एक छान छान कासवदादा आहेत."

“ते वेगळे. मी समुद्रात राहतो ! पण तू इकडं का आलीस? इथं तर पावला पावलांवर संकटं उभी आहेत. बघितलंस किती चित्रविचित्र मासे फिरतायत इकडून तिकडे! तो आठ हात असलेला अष्टभुज मासा. तो कसा उलटा चालतोय, बघितलंस का ? पाण्याच्या चुळा भरत हळूहळू मागं सरकतो. आपल्या आठ हातांनी मासे, खेकडे पकडून खातो. पाण्यात उतरणारी माणसंसुद्धा त्याला घाबरतात बरं का!"

**कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **[३]**

१. मिनू लाटांच्या पायऱ्या उतरत कोणाकडे पोहोचली?

२. समुद्राच्या तळाशी कोण बसले होते?

३. कोणत्या माशाचे तोंड घोडयासारखे होते?

**कृती २. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.** **[२]**

१. कासवदादाने अष्टभुज माशाचे वर्णन कसे केले आहे?

**कृती ३. रिकाम्या जागा भरा.** **[१]**

१. पण तो ------------------- मासा काहीच न बोलता हळूहळू पुढे गेला.

२. तो कसा ------------- चालतोय, बघितलसं का?

**कृती ४. कोण म्हणाले ते लिहा.** **[१]**

१." ते वेगळे. मी समुद्रात राहतो."

**कृती ५. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **[१]**

( मोठे, हळूहळू, कठीण, जवळ )

१. पटकन X -------------------- २. लहान X ------------------------

**प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (ANY 1)** **[५]**

१. माझा आवडता पक्षी

**मुददे** - पक्ष्याचे नाव - रंग - आवड व निवड - वर्णन - गुण - आवडण्याची कारणे

२. माझे गाव

**मुददे** - गावाचे नाव - गावाचे वर्णन - गावात काय पहिले - सण व उत्सव - प्रगती

३. झाडांचे महत्त्व

**मुददे** - झाडांचे उपयोग, वृक्षतोड - दुष्परिणाम - उपाय - काळजी

**प्रश्न ५. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.**

वेद अतिशय मस्तीखोर होता. अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपलेल्या होळीसाठी वेदची तयारी सुरू झाली होती. पेनात शाई भरून ठेव. दुधाच्या पिशव्या स्वच्छ धुऊन ठेव रंग कुठले घ्यायचे? पिचकाऱ्या कोणत्या घ्यायच्या? अशी सगळी लगबग सुरू होती. त्याने शनिवारी बाजारात जाऊन हट्टाने छानशी पिचकारी आणली होती. त्याची ही लगबग त्याची आजी बघत होती. वेदचे काय चाललेय याची तिला चांगलीच कल्पना आली होती. रविवारी संध्याकाळी आजीने त्याला जवळ बोलावले. तिने त्याच्याशी गोड बोलून त्याचा सगळा प्लान हळूच जाणून घेतला आणि आता वेदची खोड मोडायची तिने ठरवले. पण कसे ते काही तिला समजत नव्हते. विचार करता करता तिला एक युक्ती सुचली.

दोन दिवसांनी शाळेत होळी खेळायचा प्लान होता. त्याच्या दोन दिवस आधी तो शाळेतून घरी यायच्या वेळी तिने दुधाच्या पिशवीत पाणी भरून ठेवले. एक शाईचे पेन हातात ठेवले. इतकेच नाही तर एका हातात रंगदेखील भरून ठेवला. वेद शाळेतून घरी यायची त्या वाट पाहत होत्या. त्यादिवशी वेदने घराची बेल वाजवली आणि त्याला काहीही कळायच्या आत आजीने त्याच्या अंगावर पाण्याची पिशवी फेकून मारली. वेद भानावर येणार तितक्यात तिने त्याच्या अंगावर शाई फेकली आणि त्याच्या तोंडाला रंग फासला. आजीच्या अशा अनपेक्षित धक्क्याने वेद चांगलाच वैतागला.

**कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **[४]**

१. वेद कशाची तयारी करत होता?

२. आजीने दुधाच्या पिशवीत काय भरून ठेवले?

३. वेदने हट्टाने बाजारातून काय आणले?

४. आजीने कोणाची खोड मोडायची ठरवले?

**कृती २. रिकाम्या जागा भरा.** **[२]**

१. दोन दिवसांनी शाळेत ---------------------- खेळायचा प्लान होता.

२. वेद अतिशय ------------------ होता.

३. विचार करता करता तिला एक ------------------ सुचली.

४. आजीच्या अशा ------------------ धक्क्याने वेद चांगलाच वैतागला.

**कृती ३.समानार्थी शब्द लिहा.** **[१]**

( लगबग, युक्ती, हात, तोंड )

१. वदन = ---------------------- २. हस्त = ----------------------

**कृती ४.विरुद्धार्थी शब्द लिहा.** **[१]**

(चांगले, अनपेक्षित, गोड, मस्तीखोर)

१. शांत X ---------------------- २. कडू X ----------------------

**********************

# ग्रीनलॉन्स विदयालय

**INSTRUCTIONS- Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

| नाव - ------------------ | हजेरी क्र. -------- | इयत्ता - ६- अ,ब,क |
|---|---|---|

**विभाग - " ब "** **[४० मार्क]**

**प्रश्न १. खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा.** **[२]**

| खूप घाबरणे, काळजी करणे, वाढविणे, गोंधळून जाणे,<br>फिरून येणे, डोळे मोठे करून बघणे |
|---|

१. विकसित करणे - ------------------ २. चक्कर मारणे - ------------------

३. बावरून जाणे - ------------------ ४. चिंता करणे - ------------------

**प्रश्न २ अ) खालील वाक्यांतील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा.** **[४]**

१. श्रावण नावाचा एक मुलगा होता. `

उत्तर - नाम - ------------------ नामाचा प्रकार - ------------------

२. रेश्माने पत्र हातात घेतले.

उत्तर - नाम - ------------------ नामाचा प्रकार - ------------------

३. मुले बागेत खेळत होती.

उत्तर - नाम - ------------------ नामाचा प्रकार - ------------------

४. आईने मीनाला नवीन पेन आणले.

उत्तर - नाम - ------------------ नामाचा प्रकार - ------------------

**प्रश्न २ ब) खालील वाक्यांतील सर्वनाम ओळखा.** **[४]**

१. माझ्या घरासमोर एक बाग आहे. सर्वनाम - ------------------

२. त्यांनी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. सर्वनाम - ------------------

३. आम्ही सहलीला जाणार आहोत. सर्वनाम - ------------------

४. तो रोज सकाळी व्यायाम करतो. सर्वनाम - ------------------



**P.T.O.**

**प्रश्न २ क) खालील वाक्यांतील विशेषण ओळखून त्यांचे प्रकार लिहा.** **[४]**

१. माझ्याकडे पाच रंगीत पेन्सिली आहेत.

उत्तर - विशेषण - ---------------- विशेषणाचा प्रकार - ----------------

२. आम्ही मोठया घरात राहतो.

उत्तर - विशेषण - ---------------- विशेषणाचा प्रकार - ----------------

३. मामीने गोड-गोड पुरणाच्या पोळया केल्या.

उत्तर - विशेषण - ---------------- विशेषणाचा प्रकार - ----------------

४. सीमाने सात लीटर दूध आणले.

उत्तर - विशेषण - ---------------- विशेषणाचा प्रकार - ----------------

**प्रश्न ३ अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **[३]**

| |
|---|
| मैतरीण, वीलक्षण ,बलवान, वास, मैत्रीण, विलक्षण, |
| कौशल्य, धमाल, कठीन, कोशल्य, कठीण, बलावान |

१. समर्थ - ----------------

२. कसब - ----------------

३. गंध - ----------------

४. बिकट - ----------------

५. सखी - ----------------

६. अद्‌भुत - ----------------

**प्रश्न ३ ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **[३]**

| |
|---|
| नंतर, सूक्ष्म, अविजय, नंत्र, बेपर्वा, अधगती, |
| होकार, अपर्वा, अधोगती, पराजय, हाकार, सूक्शम |

१. नकार X ----------------

२. आधी X ----------------

३. पर्वा X ----------------

४. विजय X ----------------

५. प्रगती X ----------------

६. प्रचंड X ----------------

**प्रश्न ३ क) खालील शब्दांचे वचन बदला.** **[३]**

१. गणित - ------------------------------ २. पक्षी - ------------------------------

३. खांदा - ------------------------------ ४. हिरा - ------------------------------

५. आठवण - ------------------------------ ६. आकृती - ------------------------------

**प्रश्न ३ ड) खालील शब्दांचे लिंग बदला.** **[३]**

१. सिंह - ------------------------------ २. चुलता - ------------------------------

३. महाराज - ------------------------------ ४. तेली - ------------------------------

५. वेडा - ------------------------------ ६. कोकीळ - ------------------------------

**प्रश्न ४ अ) खालील शब्दांचे अर्थ लिहा.** **[३]**

| |
|---|
| अवढव्य, चंदेरी, झलक, शक्ती, खाद्य, वेगळा, शंभर वर्ष,<br>अवाढव्य, शक्ति , वेगला, हजार वर्ष, जलक |

१. चुणूक - ------------------------------ २. प्रचंड - ------------------------------

३. शतक - ------------------------------ ४. ऊर्जा - ------------------------------

५. विचित्र - ------------------------------ ६. रुपेरी - ------------------------------

**प्रश्न ४ ब) खालील शब्दांपासून वाक्य तयार करा.** **[३]**

१. दप्तर (School bag)- ------------------------------

------------------------------

२. समुद्र (Sea)- ------------------------------

------------------------------

३. विषय (Subject)- ------------------------------

------------------------------

**प्रश्न ४ क) खालील शब्दांतून अचूक शब्द निवडून लिहा.** [२]

१. आक्सिजन, ऑक्सिजन, ओक्सिजन, ऑक्सीजन - ------------------------------

२. अष्टभूज, अश्टभूज, अष्ठभुज, अष्टभुज - ------------------------------

३. घाबरगुंडी, घबरगुंडी, घाभरगूंडी, घाबरगूडी - ------------------------------

४. आभियांत्रिकी, अभीयात्रिकी, अभियांत्रिकी, अभियांत्रीकि - ------------------------------

**प्रश्न ४ ड) खालील विरामचिन्हांच्या योग्य जोड्या लावा.** [२]

| क्र. | विरामचिन्हे | उत्तर | चिन्हांची नावे |
|---|---|---|---|
| १. | ? | ------------------------------ | अवतरण चिन्ह |
| २. | . | ------------------------------ | प्रश्नचिन्ह |
| ३. | “ ” | ------------------------------ | पूर्ण विराम |
| ४. | ; | ------------------------------ | अर्धविराम |

**प्रश्न ५ अ) खालील शब्दांपासून अर्थपूर्ण शब्द बनवा.** [२]

१. समोरासमोर - ------------------------------ ------------------------------

२. वादळवारा - ------------------------------ ------------------------------

**प्रश्न ५ ब) खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** [२]

| |
|---|
| मासिक, श्रोता , शेतकरी , कवी , दैनिक , ग्रंथालय, चित्रकार , कवयित्री |

१) जिथे पुस्तके ठेवली जातात - ------------------------------

२) दररोज प्रसिद्ध होणारे - ------------------------------

३) भाषण ऐकणारा - ------------------------------

४) कविता करणारी - ------------------------------

*****************